साप्ताहिक

# विश्वनायक

Email: vishvanayak94@gmail.com

• संपादक : बिलाल शेख • VISHVANAYAK Mo.8686888898




■ बीड (महाराष्ट्र) ■ साप्ताहिक ■ द्विभाषिक ■ वर्ष - ०१ ■ अंक - ०८ ■ मंगळवार दि.१७ फेब्रुवारी २०२६ ■ पीआरजीआय रजि.नं.- एमएचबीआयएल/२५/ए४९८० ■ किंमत २ रू. ■ पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Weekly ■ BILINGUAL ■ Year - 01 ■ Issue - 08 ■ Tuesday Dt. 17 February 2026 ■ PRGI.REG.No. MHBIL/25/A4980 ■ Price - 2 Rupees ■ Pages 4

# देवेंद्र फडणवीस साहेब आदर्श मुख्यमंत्र्यासारखे वागा!

## महाराष्ट्रामध्ये असंतोष पसरेल असे बोलणे शोभणारे नाही

### श्रीपाद छिंदम, कोश्यारी, सुधांशु त्रिवेदी, प्रशांत कोरटकर छत्रपतींच्या विरोधात बोलले तेव्हा तोंड शिवले होते का?

### टिपू सुलतान प्रकरणावरून देवेंद्र फडणवीस यांच्या भूमिकेवर महाराष्ट्रप्रेमींचा संताप



**मुंबई । विश्वनायक न्यूज**

महाराष्ट्राची परंपरा संतांची, सुधारकांची आणि छत्रपतींच्या विचारांची आहे. अशा भूमीत सत्तेवर असलेल्यांनी प्रत्येक शब्द जपून उच्चारावा, ही अपेक्षा स्वाभाविक आहे. आज राज्याचे मुख्यमंत्री असलेले देवेंद्र फडणवीस यांनी संयम, समतोल आणि दूरदृष्टी दाखवणे अधिक आवश्यक आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानची तुलना छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी केल्याने वाद निर्माण झाला. त्यावर मुख्यमंत्री म्हणून निषेध नोंदवणे योग्यच होते. छत्रपतींबद्दल महाराष्ट्राच्या भावना अत्यंत तीव्र आहेत, मात्र त्यानंतर या वादाला अधिक हवा देणारे वक्तव्य, सोशल मीडियावरील आक्रमक भूमिका आणि पक्ष कार्यकर्त्यांची रस्त्यावर उतरलेली आक्रमकता यामुळे प्रश्न निर्माण होतो की, मुख्यमंत्री म्हणून आपली भूमिका नेमकी काय आहे.? जबाबदारीचे पद सांभाळत असताना अशा पद्धतीने वागणे योग्य नाही यामुळे महाराष्ट्रातील कायदा सुव्यवस्था बिघडू शकते यामुळेच सोशल मीडियातील अनेक जण आता थेट बोलू लागले असून मुख्यमंत्री साहेब आदर्श मुख्यमंत्र्यांसारखे वागा, असे ते उडपणे सांगू लागले आहेत.

पुण्यातील काँग्रेस कार्यालयावर झालेला हल्ला, महिला कार्यकर्त्यांनाही झालेली मारहाण, हे प्रकार कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय ठरू शकत नाहीत. सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी कायदा हातात घेणे आणि त्याच वेळी राज्याचा प्रमुख संयमाऐवजी राजकीय ताप वाढवणारे संकेत देत असल्याचा आरोप होणे, ही स्थिती चिंताजनक आहे. मुख्यमंत्री हे केवळ पक्षाचे नेते नसतात; ते संपूर्ण राज्याचे पालक असतात. यापूर्वी श्रीपाद छिंदम, भगत सिंग कोश्यारी, सुधांशु त्रिवेदी किंवा प्रशांत कोरटकर यांच्याकडून छत्रपतींबाबत वादग्रस्त वक्तव्ये झाली होती, तेव्हा तितक्याच तीव्रतेने भूमिका का घेतली गेली नाही, असा प्रश्न महाराष्ट्रप्रेमी उपस्थित करत आहेत. छत्रपतींबद्दलची भूमिका ही पक्षनिष्ठेवर नव्हे, तर तत्वनिष्ठेवर असली पाहिजे. मात्र फडणवीस आणि भाजप सोबतच त्या विचाराचे सगळेजण हा सुज्ञपणा विसरत असल्याचे दिसत आहे.आज काही दिवसांवर शिवजन्मोत्सव आहे आणि त्याच वेळी मुस्लिम समाजाचा पवित्र रमजान महिना सुरू होत आहे. अशा संवेदनशील काळात राज्यात सामाजिक सलोखा टिकवणे ही सर्वोच्च प्राधान्याची बाब आहे. शब्दांची ठिणगी मोठ्या आगीत रूपांतरित होण्यास वेळ लागत नाही. इतिहासाचा वापर मतभेद वाढवण्यासाठी नव्हे, तर एकात्मता बळकट करण्यासाठी व्हायला हवा. राज्याच्या प्रमुख पदावर बसलेल्या व्यक्तीने राजकीय लाभ-हानीच्या पलीकडे जाऊन सर्व समाजघटकांना विश्वास द्यायला हवा. महाराष्ट्रात दंगली पेटवू नका अशी जनतेची हाक ही केवळ भावना नाही, तर जबाबदारीची आठवण आहे.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तुम्हाला लाज वाटतेय का.? सोशल मीडियावर पुराव्यासह व्हायरल पत्राने खळबळ...

२०१३ मध्ये मुंबईतील एम/पूर्व' विभागातील बाजीप्रभू देशपांडे मार्गापासून सुरु होऊन रफीनगर नाल्यापर्यंत जाणाऱ्या शिवाजीनगर मार्ग क्र. ४ यास 'शहीद टिपु सुलतान मार्ग' असे नाव देण्याबाबतचा प्रस्ताव भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकांकडून देण्यात आला होता. महानगरपालिकेच्या तत्कालीन स्थापत्य समितीकडून तो ठराव मंजूर झाला तेव्हा आताच्या महापौर श्रीमती रितू तावडे समितीच्या सदस्या होत्या. आणि या ठरावाला अनुमोदक आताचे भाजपचे मुंबई अध्यक्ष व आमदार अमीत साटम होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तुम्हाला लाज वाटतेय का, राज्यात दंगली घडवण्यासाठी आपण व आपल्या पक्षाचे नेते प्रोत्साहन देत आहात, एका वक्तव्याचा विपर्यास करून राज्य जाळायला आपण तयार झाला आहात. आपण या राज्याचे मुख्यमंत्री आहोत, या जबाबदारीचे तरी भान राखा. आणि भाजपच्या गुंडांना दंगली घडवण्यासाठी प्रोत्साहन देणं थांबवा. हा छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आहे, हे विसरू नका, राज्यातील जनतेला गुण्यागोविंदानं जगू द्या.

### सणासुदीच्या काळात अप्रिय घटना घडल्यास जबाबदारी कोणाची?

दुर्दैवाने एखादी अप्रिय घटना घडली, तर त्याची नैतिक जबाबदारी कोणाची असेल? हा प्रश्न टाळून चालणार नाही. मुख्यमंत्री म्हणून आदर्श ठेवणे, पक्षनिष्ठेपेक्षा राज्यनिष्ठा मोठी मानणे आणि प्रत्येकाला न्याय देणारी भूमिका घेणे हीच खरी अपेक्षा आहे. महाराष्ट्राला भडकावणारे नव्हे, तर समेट घडवणारे नेतृत्व हवे आहे. मुख्यमंत्री महोदय, इतिहासाच्या नावाने राजकारण नव्हे; इतिहासाच्या प्रेरणेने प्रशासन चालवा हीच आजच्या क्षणाची गरज आहे.

### शिवजन्मोत्सव आणि रमजान महिना याचे भान राखा...

सोशल मीडियामध्ये आपले विचार व्यक्त करताना अनेक नेते कार्यकर्ते आणि सामान्य जनतेने सुद्धा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भूमिकेवर प्रचंड टीका सुरू केली आहे. एक तर आता सणासुदीचे दिवस आहेत शिवजन्मोत्सव काही दिवसांवर आला आहे त्याच वेळी रमजान महिना सुरू होत आहे. अशावेळी पोलीस बांधवांवर प्रचंड तणाव असतो. राज्यामध्ये कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी ते आटोकाट प्रयत्न करतात. देवेंद्र फडणवीस हे केवळ मुख्यमंत्री नाहीत तर ते गृहमंत्री सुद्धा आहेत, त्यामुळे राज्याची कायदा सुव्यवस्था राहणे ही त्यांची प्राथमिक जबाबदारी असली पाहिजे. त्यामुळेच या काळामध्ये त्यांनी संयम ठेवून भूमिका घेण्याची गरज असताना ते भडकवीत असल्याचे समोर येत आहे, जे छत्रपतींच्या महाराष्ट्रासाठी अत्यंत दुर्दैवी आहे.

## महावितरणचा निष्काळजीपणा की नरबळी?

### गोरे वस्तीत १५ वर्षीय बालकाचा 'करंट' लागून दुर्दैवी अंत!

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील बालेपीर भागातील गोरे वस्ती येथे महावितरण आणि संबंधित कंत्राटदाराच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे १५ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ०७:०० वाजण्याच्या सुमारास एका १५ वर्षीय निष्पाप मुलाला आपला जीव गमवावा लागला आहे. शेख आवेज शेख इरफान असे या दुर्दैवी मृत मुलाचे नाव असून, या घटनेने संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, गोरे वस्ती भागात गेल्या काही आठवड्यांपासून नवीन ट्रान्सफॉर्मर (डीपी) बसवण्याचे काम सुरू होते. महत्त्वाचे म्हणजे, या डीपीला अनेक दिवसांपासून विद्युत कनेक्शन दिलेले नव्हते. मात्र, रविवारी कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता किंवा सुरक्षेची काळजी न घेता अचानक या डीपीमध्ये वीज प्रवाह सोडण्यात आला. डीपी सुरू झाल्याची पुसटशी कल्पनाही नसलेला आवेज खेळता खेळता या डीपीला चिटकला आणि त्याला काळजाचा थरकाप उडवणारा विजेचा धक्का बसला. हा धक्का इतका तीव्र होता की, या १५ वर्षीय मुलाचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर परिसरात प्रचंड तणाव निर्माण झाला असून स्थानिक नागरिकांनी महावितरणच्या कारभारावर वाभाडे काढले आहेत. नागरिकांचे गंभीर आरोप खालीलप्रमाणे आहेत सूचना का दिली नाही? डीपीमध्ये वीज प्रवाह सोडण्यापूर्वी परिसरात कोणतीही दवंडी किंवा नोटीस का देण्यात आली नाही? सुरक्षा कठडे कुठे आहेत?: भरवस्तीत डीपी बसवताना त्याला आवश्यक असलेले सुरक्षा कुंपण का लावण्यात आले नव्हते? कंत्राटदाराची मनमानी: नवीन काम सुरू असताना संबंधित लाईनमन आणि गुत्तेदार (कंत्राटदार) घटनास्थळी का हजर नव्हते? हा अपघात नसून महावितरणने केलेला खून आहे. जोपर्यंत दोषी लाईनमन आणि कंत्राटदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही, अशा संतप्त भावना स्थानिक रहिवाशांनी व्यक्त केल्या आहेत.

### तपास आणि कारवाईची मागणी..

घटनेनंतर मृतदेह जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी नेण्यात आला आहे. दरम्यान, या घटनेमुळे विजेच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. प्रशासनाने केवळ पंचनामा करून थांबू नये, तर या निष्पाप जीवाच्या मृत्यूला कारणीभूत ठरणाऱ्या 'त्या' बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## तक्रार का दिली म्हणून कुटुंबावर दुसऱ्यांदा जीवघेणा हल्ला

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील सहयोग नगरमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या वादातून पिता-पुत्रावर भररस्त्यात प्राणघातक हल्ला करण्यात आला. पाच दिवसांपूर्वीही घरात घुसून मारहाण झाली होती. शहरातील सहयोग नगर परिसर आज सकाळी पुन्हा एकदा दहशतीच्या छायेत गेला. सदाशिव कोकाट आणि त्यांचा मुलगा हे नेहमीप्रमाणे आपल्या दुकानाकडे जात असताना, त्यांच्या एमआयडीसी भागातील घरासमोर दबा धरून बसलेल्या टोळक्याने भररस्त्यात त्यांच्यावर काठ्या लाठ्यांनी व शस्त्रांनी हल्ला चढवला. या बेदम मारहाणीत पिता-पुत्र गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, हल्लेखोरांनी अचानक रस्ता अडवून शिवीगाळ करत मारहाण सुरू केली. काही क्षणातच परिसरात गोंधळ उडाला. नागरिकांनी धाव घेईपर्यंत हल्लेखोरांनी दोघांना गंभीर जखमी करून पसार झाल्याचे सांगितले जाते. या घटनेपूर्वी अवघ्या पाच दिवसांपूर्वी याच टोळक्याने कोकाट कुटुंबाच्या घरात घुसून महिलांना मारहाण केल्याचा आरोप आहे. या टोळक्यात काही महिलांचाही समावेश असल्याचे सांगितले जाते. त्या वेळी छेडछाडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र आम्ही मारहाणीची तक्रार का दिली? या कारणावरून सूडबुद्धीने आजचा हल्ला झाल्याचा आरोप कोकाट कुटुंबीयांनी केला आहे.

## महावितरणचा 'शॉक'दायक कारभार; बीडमध्ये ट्रान्सफॉर्मरला भीषण आग, मोठी दुर्घटना थोडक्यात टळली!

### तक्रारींकडे महिनाभर दुर्लक्ष; अधिकाऱ्यांची दांडी

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील तकीय्या मस्जिद परिसरात काल सकाळी महावितरणच्या भोंगळ कारभाराचा आणखी एक नमुना पाहायला मिळाला. येथील मस्जिदच्या वॉल कंपाऊंडला लागून असलेल्या ट्रान्सफॉर्मरला १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११:०० वाजण्याच्या सुमारास अचानक ट्रांसफार्मरला भीषण आग लागली. सुदैवाने, स्थानिक नागरिकांनी प्रसंगावधान राखत पाण्याचा मारा करून आग विझवली, अन्यथा मोठी जीवितहानी होण्याची शक्यता होती.

मिळालेल्या माहितीनुसार, या ट्रान्सफॉर्मरबाबत स्थानिक नागरिकांनी गेल्या एक महिन्यापासून महावितरणकडे वारंवार फोन करून तक्रारी केल्या होत्या. ट्रान्सफॉर्मरमधून ठिणग्या पडणे आणि तांत्रिक बिघाड असल्याबाबत कळवूनही अधिकाऱ्यांनी त्याकडे पूर्णपणे कानाडोळा केला. आज जेव्हा आग लागली, तेव्हा घटनास्थळी





महावितरणचा एकही अधिकारी किंवा कर्मचारी फिरकला नाही. आगीचे स्वरूप प्रचंड होते, मात्र महावितरणची वाट न पाहता स्थानिक तरुणांनी पुढाकार घेतला. स्वतःचा जीव धोक्यात घालून नागरिकांनी पाण्याचा वापर करून आग आटोक्यात आणली. जर नागरिकांनी तत्परता दाखवली नसती, तर मस्जिद आणि लगतच्या निवासी भागाला मोठा धोका निर्माण झाला असता. स्थानिकांचा संतप्त सवाल: आम्ही महिनाभर ओरडून सांगत होतो की हा ट्रान्सफॉर्मर धोकादायक आहे, पण प्रशासनाला जाग आली नाही. आज जर कोणाचा जीव गेला असता, तर त्याला जबाबदार कोण? महावितरण केवळ बिल वसुलीसाठी तत्पर असते का? बीडची जनता आता विचारत आहे: महावितरणच्या या गलथान कारभारावर वरिष्ठ अधिकारी काय कारवाई करणार? की अजून मोठ्या दुर्घटनेची वाट पाहिली जात आहे?

## सिमेंटच्या गोणीतून गांज्याची तस्करी; दोघे ताब्यात

**चौसाळा । प्रतिनिधी**

नेकनूर पोलिसांनी गांज्याची तस्करीचे रॅकेट बुधवारी (दि.११) रात्री उघडकीस केले आहे. सिमेंटच्या गोणीतून गांज्याची तस्करी करण्यात येत असल्याची माहिती मिळाल्यावरून सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांनी एका शेतात छापा मारून याचा फर्दाफाश केला. या कारवाईत ११ किलो १५० ग्रॅम गांजा ज्याची किंमत २ लाख ७८ हजार ७५० रुपयांच्या घरात असल्याची माहिती आहे. नेकनूर पोलिसांनी यावेळी दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल केले.

नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हिंगणी बुद्रुक गावात एका उसाच्या शेतात सिमेंटच्या गोणीत गांज्या भरून ठेवण्यात आला होता. याची माहिती नेकनूर पोलिसांना झाल्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी व त्यांच्या टीमने छापा मारला. यावेळी शेतात दोन सिमेंटच्या गोणीत ११ किलो १५० ग्रॅम गांज्या पोलिसांना सापडला. या गांज्याची तस्करी होणार असतानाच पोलिसांनी गुमानसिंग शिवराम पावरा (वय-३५, रा.बोरमल्ली पाडा, ता.शिरपूर, जि.धुळे) व मनोज सीताराम मेहता (वय१९, रा.बाखरली, ता.वरला, जि.बडवानी राज्य मध्यप्रदेश) या दोघांना रंगेहात पकडले आहे. नेकनूर पोलीस ठाण्यात दोन्ही आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला असून याप्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आहेर हे करीत आहेत.

## विकासासाठी विरोधी पक्षात मातब्बर तर सत्तेत नवागत हवे!

### बीड नगर परिषदेत अशीच स्थिती : एस.एम.युसूफ

**बीड । प्रतिनिधी**

गाव, शहर, तालुका, जिल्हा, राज्य, देश काहीही असो तिथे विकास करायचा असेल तर विरोधी पक्षात मातब्बर आणि सत्तेत नवागत हवेत. यावेळी बीड नगर परिषदेसाठी नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर नेमकी अशीच स्थिती असल्याने बीड शहरवासियांना आता शहराचा खरोखरच विकास होईल असा विश्वास वाटू लागल्याचे प्रतिपादन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, बीड शहराचा विचार केला असता येथील नगरपरिषदेत गेल्या जवळपास ३०-३५ वर्षांपासून एकाच घराण्याची सत्ता होती. एवढा मोठा काळ एका घराण्याचा किंवा कुटुंबीयांचा वरदहस्त सत्तेत राहिल्याने शहरातील नागरिकांना जगण्यासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सोयीसुविधा ज्यात प्रामुख्याने चांगले रस्ते, नाल्या, नळांना वेळेवर पिण्याचे पाणी, अखंडित वीज पुरवठा, कचऱ्याचा योग्य निचरा यापेक्षा जास्त काही अपेक्षा नसताना ते सुद्धा सत्ताधाऱ्यांकडून मिळाले नाही.



जनतेच्या सत्ताधाऱ्यांकडून असलेल्या या किमान अपेक्षाही वर्षानुवर्षे सत्ता उपभोगून जर सत्ताधारी पूर्ण करू शकत नसतील तर अशा राजकारण्यांचा उपयोग काय? पाणी एका जागी जास्त दिवस साचले तर त्याचे रूपांतर गलिच्छ डबक्यात होते. तशीच अवस्था एक हाती सत्ता जर उपभोगली जाऊ लागली तर तेथील विकासाचीही होते. असाच प्रकार गेली अनेक वर्षे बीड शहरात होता. म्हणूनच संपूर्ण बीड शहराची अवस्था ही गलिच्छ डबक्यासारखीच झालेली आहे. या अवस्थेने कंटाळलेल्या बीड शहरवासियांनी उशिराने का होईना मातब्बरांना विरोधी बाकावर बसविले तर नवागतांना सत्ताधारी बनविले. सुदृढ लोकशाहीसाठी मातब्बर सुद्धा विरोधी बाकावर बसलेले असावे. त्यांच्या मातब्बरपणामुळे त्यांच्याकडून सत्ताधाऱ्यांवर चांगल्या प्रकारे वचक ठेवता येतो. अन्यथा सत्ताधाऱ्यांना मोकळे रान मिळते. जे आतापर्यंत बीड शहरवासीयांनी पाहिलेच आहे. पुन्हा अशी अवस्था होऊ नये. शहराचा सर्वांगीण विकास व्हावा. शहरवासीयांना चांगले रस्ते, नाल्या, नळांना वेळेवर पाणी, अखंडित वीज पुरवठा मिळावा याकरिता यापुढेही मातब्बरांना कायम विरोधात ठेवून नवागतांना सत्तेत ठेवावे लागेल.

बीड नगरपालिकेची निवडणूक झाल्यापासून याचा परिणाम दिसतोच आहे. ज्या मातब्बरांना फक्त जनतेकडून आलेली निवेदने, तक्रारी अर्ज घेऊन थप्पी ला लावायची सवय होती, त्यांचेच उत्तराधिकारी आता विरोधी पक्षात असल्याने त्यांच्याकडून मोठमोठ्या नेत्यांसह मोठ्या अधिकाऱ्यांसमोर वेगवेगळ्या प्रश्नांची निवेदने दिली जाऊ लागली आहेत. परिवर्तन आपल्या भारत देशाच्या लोकशाहीत जनतेला मिळालेल्या मताधिकारामुळे झाले आहे. म्हणूनच विकासासाठी विरोधी पक्षात मातब्बर तर सत्तेत नवागत हवे याची प्रचिती येऊ लागली आहे. बीड नगर परिषदेत अशीच स्थिती असल्याने आता बीड शहराचा खोटा आणि कागदी नाही तर खराखुरा विकास होईल अशी अपेक्षा बीड शहरवासियांना असल्याचेही शेवटी मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी नमूद केले आहे.

## किरकोळ वादातून तरुणाला अमानुष मारहाण

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील मुख्य रस्त्यावर चव्हाण हॉस्पिटलसमोर रविवारी रात्री एक भीषण घटना घडली. गाडीला कट मारल्याचा जाब विचारल्याच्या कारणावरून शुभम रूपचंद कांबळे या तरुणाला पाच जणांनी मिळून बेदम मारहाण केली. या प्रकरणी जातीवाचक शिवीगाळ आणि जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपाखाली माजलगाव शहर पोलिसांनी पाचही संशयितांना ताब्यात घेतले आहे.

शुभम कांबळे हा आपली स्कुटी घेऊन मुख्य रस्त्यावरून जात असताना रवी कुऱ्हाडे याने त्याच्या गाडीला कट मारला. शुभमने 'कट का मारला?' अशी विचारणा केली असता, रवीने त्याला जातीवाचक शिवीगाळ करत गाडीला पाठीमागून धडक दिली. त्यानंतर रवी कुऱ्हाडे आणि लक्ष्मण शिंदे यांनी इतरांना जमवून शुभमला खाली पाडून मारहाण करण्यास सुरुवात केली. शुभमने जिवाच्या भीतीने पळून जाण्याचा प्रयत्न केला असता, विशाल, विलास आणि राहुल चव्हाण यांनी त्याला पकडून ठेवले. यावेळी रवी कुऱ्हाडे याने शुभमचा गळा दाबून त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केला, तर लक्ष्मण शिंदे याने त्याला अवघड जागेवर आणि छातीवर लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. शुभमचे वडील रूपचंद कांबळे हे मुलाला वाचवण्यासाठी धावले असता, त्यांनाही जातीवाचक शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी देण्यात आली.

सम्पादकीय

# एटीएस ने २१ जगहों पर मारे छापे

राज्य एंटी टेररिज्म स्कॉड (एटीएस) ने शनिवार रात महाराष्ट्र के तीन जिलों में करीब २१ जगहों पर छापेमारी की। ये जिले अहिल्यानगर, अकोला और यवतमाल हैं। यहां से काफी मात्रा में एटीएस को संवेदनशील दस्तावेज, ऑडियो-विडियो फुटेज, इलेक्ट्रॉनिक उपकरण और गोपनीय नक्शा के अलावा आपत्तिजनक सीसीटीवी फुटेज मिले हैं। कई प्रमुख जगहों की तस्वीरें भी एटीएस के हाथ लगी हैं। हालांकि, इस मामले में किसी की गिरफ्तारी की पुष्टि एटीएस ने नहीं की है, लेकिन दोनों जिले से डेढ़ दर्जन से अधिक लोगों को पूछताछ के लिए डिटेन किया गया है। इनके लिंक को प्रतिबंधित 'अंसार इंटेरिम' नामक आतंकी संगठन से खंगाले जा रहे हैं, जिसके अहम सदस्य अदील को संगठन में नए-नए युवाओं को भर्ती करने की जिम्मेदारी सौंपी गई है। बता दें कि अंसार इंटेरिम प्रतिबंधित आंतकी संगठन अल कायदा से जुड़ा है। इसलिए एटीएस को शक है कि यवतमाल और अहिल्यानगर से जिन युवाओं को संगठन में भर्ती किए जाने की योजना थीं, उसका कनेक्शन सीमा पार पाकिस्तान से है। क्योंकि, एटीएस को छापेमारी के दौरान स्थानीय युवाओं के कुछ निजी कागजात भी मिले हैं, जिससे यह संदेह यकीन में बदल रहा है। सूत्र बताते हैं कि एटीएस ने संदिग्धों के घरों,ऑफिस और दूसरी जगहों की तलाशी में जब्त चीजें व सीसीटीवी फुटेज की जांच में आतंकी संगठनों से लिंक या युवाओं को इकट्ठा करने की कोशिशों से जुड़ी चीज़ें मिलने की बात कही है। वहीं, खबर लिखे जाने तक डिटेन किए गए लोगों से एटीएस द्वारा पूछताछ जारी थी। पुलिस ने लोगों से अपील की है कि वे अफवाहों पर यकीन न करें। एटीएस के अधिकारियों ने बताया कि अहिल्यानगर के मुकुंदनगर इलाके में एक साथ सात जगहों पर छापेमारी की गई जबकि यवतमाल जिले के पुसद और अकोला जिले के उमरखेड़ में भी छापे मारे गए। एटीएस को खुफिया विभाग से एक कॉन्फिडेंशियल टिप मिली थी, ज़िसके आधार पर छापेमारी की गई। एक अधिकारी ने नाम नहीं बताने के शर्त पर बताया कि पिछले दिनों कथित आंतकी गतिविधियों में संलिप्त पुणे से पकड़े गए एक इंजिनियर और ठाणे के मुंब्रा से पकड़े गए एक टीचर के घर से मिले आपत्तिजनक दस्तावेज व हिरासत में लिए गए कुछ युवाओं के हुई पूछताछ में इनके लिंक यवतमाल में होने की जानकारी मिली थीं। इस इनपुट्स को एटीएस ने केंद्रिय खुफिया एजेंसियों से साझा किया था, जिसके बाद पूरे सिंडिकेट का तार मुंबई व आसपास के जिलों से अधिक नासिक, यवतमाल, अकोला और अहिल्यानगर में होना मिला। इस अधिकारी के अनुसार, इन जिलों में एक खास वर्ग की आबादी अधिक होने से संदिग्ध गतिविधियों को अंजाम देने से पहले होमवर्क करने के लिए प्रतिबंधित संगठनों को मनमाफिक जगह व आदमी मिल जाता है। इसलिए ये इन जिलों को टारगेट कर स्लीपर सेल बनाकर उसको भर्ती करने के बाद आंतकी ट्रेनिंग देने के लिए सीमा पार भेजने की योजना पर काम करने में जुटे हुए थे। हालांकि, एटीएस की इस कार्रवाई से स्थानीय लोगों में नाराजगी भी है। काफी संख्या में पुलिसकर्मियों के पहुंचने से इलाके में हड़कंप मच गया था। लेकिन, लोकल क्राइम ब्रांच और पुलिस की पुख्ता बंदोबस्त के कारण कोई अप्रिय घटना नहीं घटी है। एटीसी ने केंद्रिय सुरक्षा एजेंसियों द्वारा मिले खुफिया अलर्ट के बाद राज्य भर में सतर्कता बढ़ा दी है। सूत्र बताते हैं कि आने वाले दिनों में इस मामले में और लोग डिटेन किए जा सकते हैं,जिनमें से कई लोगों की गिरफ्तारियां होने की भी संभावना हैं। एटीएस इस कार्रवाई को आतंकी गतिविधियों के खिलाफ एक अहम कदम मान रहे हैं। हालांकि, इस ऑपरेशन के पीछे असली वजह क्या है? किस ऑर्गनाइजेशन या नेटवर्क की संलिप्तता है?अभी तक इस बारे में एटीएस ने ऑफिशियल जानकारी नहीं दी है। लेकिन, चर्चा है कि संदिग्ध मूवमेंट,फाइनेंशियल ट्रांज़ैक्शन और संभावित टेररिस्ट कनेक्शन के एंगल से ही पूरी कार्रवाई की जांच चल रही है।

## लिंबागणेश येथे जिओ नेटवर्क सेवा खंडित

# टॉवरवर चढून लक्षवेधी आंदोलन

### महसूल व पोलीस प्रशासनाच्या मध्यस्थीने आंदोलन तात्पुरते स्थगित : डॉ. गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाट परिसरातील लिंबागणेश व पंचक्रोशी भागात रिलायन्स जिओ मोबाईल नेटवर्क सेवा गेल्या महिनाभरापासून वारंवार खंडित होत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. नेटवर्क रेंज पूर्ण दिसत असतानाही इंटरनेट बंद पडणे, कॉल न लागणे व कॉल ड्रॉप होणे यासारख्या गंभीर तांत्रिक समस्यांमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या समस्येचा सर्वाधिक फटका विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन शिक्षणाला, बँक व डिजिटल व्यवहारांना, व्यापारी उलाढालींना तसेच आरोग्य व शासकीय सेवांना बसत आहे. इंटरनेट सेवा ठप्प झाल्याने ऑनलाईन पेमेंट, पैसे



ट्रान्सफर व सरकारी पोर्टलवरील कामे ठप्प झाल्याचे नागरिकांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर जिओ कंपनीने तातडीने नेटवर्क सेवा सुरळीत करावी, कायमस्वरूपी उपाययोजना राबवाव्यात व तांत्रिक अडचणी दूर कराव्यात, या प्रमुख मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते तसेच बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली आज गुरुवारी सकाळी लिंबागणेश येथील जिओ टॉवरवर चढून लक्षवेधी आंदोलन करण्यात आले. महसूल व पोलीस प्रशासनाच्या मध्यस्थीने आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले. निवेदन लिंबागणेश पोलिस चौकीचे सहाय्यक फौजदार राठोड, मंडळ अधिकारी पंडित नाईकवाडे व तलाठी पोतदार यांच्या मार्फत जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक व नेकनूर पोलिस स्टेशन यांना देण्यात आले.

या आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, शिवशक्ती-भीमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील, ग्रामपंचायत सदस्य दामोदर थोरात, सुरेश निर्मळ, मधुकर थोरात, सर्पमित्र अशोक जाधव, औदुंबर नाईकवाडे, विक्रांत वाणी, सोनाजी शिंदे, सोनाजी कुदळे, संजय पावले,केशव गिरे आदी उपस्थित होते. दरम्यान, जिओ कंपनीच्या ढिसाळ सेवेविरोधात ग्रामस्थांनी बहिष्काराचा निर्धार व्यक्त केला असून अनेक युवकांनी आपली जिओ सिमकार्डे इतर कंपन्यांकडे पोर्ट करण्यास सुरुवात केली आहे. तातडीने सेवा सुधारली नाही, तर आणखी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

## बीड शहरात जल्लोषात संत सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्था, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये संत सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. सर्वत्र धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून समाजबांधवांनी आपल्या श्रद्धेची प्रचिती दिली.

शहरातील संत श्री सेवालाल महाराज चौक येथे रविवारी (ता.१५) सकाळी ९ वाजता मुख्य कार्यक्रम पार पडला. शहरासह तालुक्यातील बंजारा समाजबांधव मोठ्या संख्येने एकत्रित आले होते. पारंपरिक बंजारा पद्धतीने 'भोग' अर्पण करून संतांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. ढोल-ताशांच्या गजरात आणि जयघोषात परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी संत सेवालाल महाराज यांच्या जीवनकार्यावर प्रभावी भाषणे केली. समाजजागृती, सदाचार, एकता आणि आध्यात्मिकतेचा संदेश त्यांनी आपल्या विचारांतून अधोरेखित केला. काही विद्यार्थ्यांनी बंजारा पारंपरिक वेशभूषा परिधान करून रंगतदार बंजारा गीत सादर केले. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रमही राबविण्यात आले. काही ठिकाणी रक्तदान शिबिरे तर गरजूंना अन्न करण्यात आले. समाजातील ऐक्य, संस्कृतीची जपणूक आणि नव्या पिढीपर्यंत संतांच्या विचारांचा वारसा पोहोचवण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. एकूणच, संत सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती ही केवळ धार्मिक उत्सव न ठरता सामाजिक एकात्मतेचा आणि संस्कृती जपण्याचा संदेश देणारा प्रेरणादायी सोहळा ठरला.

## शिवजन्मोत्सव समिती आणि संचेती हॉस्पिटल आयोजित भव्य अस्थिरोग व मनके विकार निदान व उपचार शिबिर

### बहुसंख्य नागरिकांनी लाभ घ्यावा : डॉ.रविंद्र राजपुरे

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा शहरात शिवजन्मोत्सव समिती आणि संचेती हॉस्पिटलच्या माध्यमातून दि.१८ फेब्रुवारी बुधवार रोजी सकाळी ८ ते २ यावेळी मोफत अस्थिरोग व मणके विकार निदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. पाटोदा येथे आरोग्याचा जागर करीत शिवजयंती साजरी होणार आहे. अस्थिरोगाने त्रस्त रुग्णांनी या मोफत शिबाराचा लाभ घ्यावा असे आव्हान पाटोदा तालुका डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष व संचेती हॉस्पिटलचे पॅनल मेंबर डॉक्टर रवींद्र राजपुरे यांनी केला आहे.



भारतातील नामांकित संचेती इन्स्टिट्यूट फॉर ऑर्थोपेडिक्स अँड रिहाबिलीटेशन पुणे आणि शिवजन्मोत्सव समिती पाटोदा यांच्या वतीने २०२२ पासून शिवजन्मोत्सव समिती आणि संचेती हॉस्पिटल पुणे यांच्या वतीने शिबिर घेण्यात येत आहे. तसेच दरमहा पाटोदा येथील राजपुरे हॉस्पिटल मध्ये कॅम्प घेण्यात येतो. यामध्ये अस्थिरोगाने पिडीत रुग्ण पाटोदा शहरातच संचेती हॉस्पिटलच्या तज्ञ डॉक्टरांच्या निगराणी खाली उपचार घेत असल्याने या कॅम्पला भरभरून प्रतिसाद मिळत संचेती हॉस्पिटलचे तज्ञ डॉक्टरांनी ५००० रुग्णांना अद्यापपर्यंत उपचार केले आहे. यंदाच्या शिवजयंती निमित्त हे तज्ञ डॉक्टर रुग्णांना मोफत सेवा देणारा असून यामध्ये प्रामुख्याने सांधेदुखी, संधीवात, सांधेप्रत्यारोपण, कंबर दुखणे, हाता-पायांना मुंग्या येणे, फ्रोजन शोल्डर, मणक्यांचे जुने आजार, डायबेटिक न्यूरोपॅथी, सायटिका पेन, टेनिस एल्बो मेंदूचे आजार, हिप व नील रिप्लेसमेंट नंतरचे उपचार करण्यात येणार आहे. तरी या शिबिराचे सर्व पाटोदा व परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन डॉ.रविंद्र राजपुरे यांनी केले असुन गरजु लोकांनी लवकरात लवकर राजपुरे हास्पिटल बार्शी रोड नगरपंचायत समोर येथे नोंदणी करावी असे आवाहनही शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## शिरूर (का) लमान तांडा येथे संत सेवालाल महाराज जयंती उत्साहात साजरी

**शिरूर (का) । प्रतिनिधी**

शिरूर कासार तालुक्यातील लमान तांडा येथे संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीस सहकुटुंब उपस्थित राहून मोठ्या थाटामाटात जयंती साजरी केली (१५ फेब्रुवारी १७३९ - ४ डिसेंबर १८०६) हे गोर बंजारा समाजाचे आराध्य दैवत, महान समाजसुधारक आणि आध्यात्मिक गुरु होते. त्यांचा जन्म कर्नाटक-आंध्र प्रदेश सीमाभागात झाला. त्यांनी बंजारा समाजात जागृती, स्वच्छता, व्यसनमुक्ती आणि अहिंसेचा प्रसार केला. पोहरादेवी (महाराष्ट्र) हे त्यांचे मुख्य तीर्थक्षेत्र आहे.



संत सेवालाल महाराज यांची महत्त्वाची माहिती जन्म आणि बालपण: सेवालाल महाराज यांचा जन्म १५ फेब्रुवारी १७३९ रोजी कर्नाटकच्या शिमोगा जिल्ह्यातील सुरगोंडनकोप्पा (सध्या सेवागड) येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भीमा नाईक आणि आईचे नाव धरमणी (जयाराम वडतीया यांची कन्या) होते. समाजासाठी कार्य: बंजारा समाजात रुजलेल्या अंधश्रद्धा, अनिष्ट प्रथा आणि कुप्रथा दूर करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. शिकवण: महाराजांनी सत्य, अहिंसा, प्रामाणिकपणा आणि मानवी कल्याणाचा संदेश दिला. त्यांनी व्यसनमुक्त राहण्याचा आणि स्त्रियांना सन्मान देण्याचा उपदेश केला.

बंजारा संस्कृती आणि भाषेचे संवर्धन: बंजारा समाजाला साक्षर करण्यासाठी त्यांनी लोकगीते, भजन आणि लडीच्या माध्यमातून प्रबोधन केले. अध्यात्म आणि पोहरादेवी: पोहरादेवी (वाशिम जिल्हा, महाराष्ट्र) येथे त्यांची समाधी आहे, ज्याला बंजारा समाजाचे 'काशी' मानले जाते. जयंती: त्यांची जयंती १५ फेब्रुवारी रोजी बंजारा समाजाद्वारे मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. संत सेवालाल महाराज हे त्याग आणि दूरदर्शी विचारांचे प्रतीक मानले जातात, ज्यांनी भटक्या जमातींना सन्मानाने जगण्याचा मार्ग दाखवला. क्रांतिकारी युगपुरुष संत सेवालाल महाराज १९ ॠशल २०१५ - सांड की गरजना सुनकर भाग चले जंगल के शेर ।। संत सेवालाल महाराजांनी समाजातील कुप्रथा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. दारूबंदी करून स्त्रियांना अधिकार दिले. बंजारा समा.. यावेळी लमान तांड्यावरील गोर बंजारा समाज खूप मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महामाता भीमाई आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा, बीड तालुका यांच्या वतीने बीड येथील महासभेच्या कार्यालयात महामाता भीमाई रामजी आंबेडकर यांची जयंती मोठ्या आनंदात व उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला बौद्ध बांधवांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते महामाता भीमाई आंबेडकर तसेच बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. यावेळी श्रामणेर बोधाचार्य बुद्धघोष यांनी उपस्थित सर्व पदाधिकारी व बौद्ध उपासकांना त्रिसरण व पंचशील देऊन आध्यात्मिक मार्गदर्शन केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभेचे बीड तालुका अध्यक्ष. राजेंद्र ससाणे हे होते. यावेळी ॲड. जाधव, ओमप्रकाश गायकवाड, तसेच भारतीय बौद्ध महासभेचे कोषाध्यक्ष गोपीनाथ बनसोडे यांनी महामाता भीमाई यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. वक्त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, महामाता भीमाई या सुभेदार रामजी सकपाळ (आंबेडकर) यांच्या पत्नी आणि धर्माजी पंडित (मुरबाडकर) यांच्या कन्या होत्या. त्या स्वाभिमानी, कर्तृत्ववान आणि आत्मसन्मान जपणाऱ्या महिला होत्या. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी कधीही कोणापुढे हात पसरला नाही. त्यांच्या संस्कारांचा प्रभाव पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्व घडणीत मोठ्या प्रमाणात दिसून येतो, असेही वक्त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.गौतम खेमाडे यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रमास विश्वभर बनसोडे, ॲड. सोनवणे, सिद्धार्थ गरुड तसेच इतर बौद्ध उपासक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी अध्यक्ष राजेंद्र ससाणे यांनी उपस्थितांचे आभार मानले. 'सरनतय' ग्रहण करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. महामाता भीमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बीडमध्ये बौद्ध समाजात उत्साहाचे व प्रेरणेचे वातावरण पाहायला मिळाले.

# एपस्टीन फाईल्स : सत्तेच्या सावल्यांतील सत्याचा शोध

जगात लोकशाही, मानवी हक्क आणि न्यायव्यवस्थेच्या उच्च मूल्यांबद्दल मोठमोठ्या घोषणा केल्या जातात; परंतु काही प्रकरणे अशी असतात की ती या सर्व मूल्यांच्या पायावरच प्रश्नचिन्ह उभे करतात. एपस्टीन फाईल्स हे असेच एक प्रकरण आहे, जे केवळ एका व्यक्तीच्या गुन्ह्यांपुरते मर्यादित नसून, सत्ता, पैसा, प्रभाव आणि गुप्त संगनमत यांच्या गुंतागुंतीच्या जाळ्याकडे बोट दाखवते. हे प्रकरण आपल्याला विचारायला भाग पाडते की कायद्यापुढे सर्व समान आहेत का, की काहींचे हात इतके लांब असतात की ते न्यायालाही वाकवू शकतात? जेफ्री एपस्टीन हा अमेरिकन वित्तव्यवसायिक म्हणून ओळखला जात असला तरी त्याचे नाव जगभरात अल्पवयीन मुलींच्या लैंगिक शोषणाच्या आरोपांमुळे कुप्रसिद्ध झाले. त्याच्या संपर्कात अनेक प्रभावशाली राजकारणी, उद्योगपती, सेलिब्रिटी आणि सत्ताधारी मंडळी असल्याचे आरोप आणि दस्तऐवज समोर आले. त्याच्या खाजगी विमान प्रवासाच्या नोंदी, भेटीगाठींचे रेकॉर्ड, न्यायालयीन कागदपत्रे आणि साक्षीदारांचे जबाब, या सर्वांचा एकत्रित उल्लेख म्हणजेच एपस्टीन फाईल्स. हे प्रकरण केवळ एका गुन्हेगाराच्या कृत्यांवर पडदा टाकत नाही, तर एक मोठा प्रश्न विचारते, सत्ताधाऱ्यांच्या वर्तुळात प्रवेश मिळाला की कायद्याचे दात बोथट होतात का?

एपस्टीन प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे त्याने अनेक वर्षे संशयाच्या भोवऱ्यात राहूनही प्रभावशाली संबंधांच्या जोरावर स्वतःला वाचवले. गंभीर आरोप असूनही त्याच्यावर कारवाई उशिरा झाली, शिक्षा सौम्य झाली आणि तपासात अनेक पोकळ्या राहिल्या. यामुळे सामान्य नागरिकांच्या मनात शंका निर्माण होणे स्वाभाविक आहे. जेव्हा फाईल्समधून मोठमोठी नावे पुढे येऊ लागली, तेव्हा जगभरात खळबळ उडाली. समाजाने असा प्रश्न विचारला जर सामान्य व्यक्ती असती, तर न्यायप्रक्रिया इतकी संथ राहिली असती का? की तिला आधीच कठोर शिक्षा झाली असती? या प्रकरणात माध्यमांची भूमिका देखील तपासली गेली. काही पत्रकारांनी जीवाची बाजी लावून तपास पत्रकारिता केली, पीडितांचे आवाज पुढे आणले आणि बंद दरवाज्यांमागचे व्यवहार उघड केले. परंतु त्याचवेळी काही माध्यमसंस्थांवर आरोप झाले की त्यांनी प्रभावशाली लोकांच्या दबावामुळे बातम्या दाबून ठेवल्या.

पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा स्तंभ मानली जाते. जर हा स्तंभच दबावाखाली वाकला, तर सत्याचा आवाज कुठे ऐकू येणार? एपस्टीन फाईल्सने माध्यमविश्वालाही आत्मपरीक्षण करायला भाग पाडले आहे. या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा आणि संवेदनशील भाग म्हणजे पीडित मुली व महिला. अनेकांनी वर्षानुवर्षे भीती, दबाव आणि सामाजिक कलंक सहन करत आपले अनुभव मांडले. त्यांचे म्हणणे होते, गुन्हा फक्त एका व्यक्तीने केला नाही, तर एक संपूर्ण व्यवस्था त्याला संरक्षण देत होती. न्यायालयीन प्रक्रियेत नावं, तारखा, ठिकाणं चर्चेत येतात; पण त्या मागे असतात तुटलेल्या आयुष्यांच्या कथा. एपस्टीन फाईल्स हे केवळ दस्तऐवज नाहीत, त्या असंख्य वेदनांच्या साक्षी आहेत. न्याय म्हणजे केवळ शिक्षा नव्हे; तर पीडितांचा सन्मान, पुनर्वसन आणि सत्याची अधिकृत कबुलीही आहे.



**प्रविण बागडे, नागपूर**
मो.९९२३६२०९१९

या प्रकरणाने एक भीषण वास्तव दाखवले सत्ता, पैसा आणि संपर्क यांचे जाळे इतके घट्ट असू शकते की ते कायद्यालाही गोंधळात टाकू शकते. जेव्हा उच्चभ्रू वर्तुळात गुन्हे लपवले जातात, तेव्हा लोकशाही कमकुवत होते. कारण लोकशाहीचा पाया आहे पारदर्शकता आणि उत्तरदायित्व. एपस्टीन फाईल्स हा जगातील सर्व लोकशाही व्यवस्थांसाठी एक इशारा आहे.

कायद्याची पकड सर्वांवर समान असली पाहिजे. अन्यथा कायदा सर्वांसाठी समान हे वाक्य फक्त घोषवाक्य राहते. या प्रकरणाभोवती अनेक षडचंत्र सिद्धांतही फिरतात. गुप्त नेटवर्क, राजकीय सौदे, रहस्यमय मृत्यू, दडपलेले पुरावे. सोशल मीडियाच्या युगात अफवा आणि तथ्य यांची सरमिसळ वेगाने होते. त्यामुळे जबाबदार तपास, अधिकृत कागदपत्रे आणि न्यायालयीन निष्कर्ष यांना अधिक महत्त्व प्राप्त होते.

समाजाने अंधविश्वास आणि अफवांपासून दूर राहून पुराव्यावर आधारित चर्चा करणे आवश्यक आहे. अन्यथा सत्याचा शोध गोंधळात हरवतो. एपस्टीन फाईल्स हे अमेरिकेतील प्रकरण असले तरी त्यातील धडे सार्वत्रिक आहेत. कोणत्याही देशात, कोणत्याही व्यवस्थेत जर प्रभावशाली लोकांना कायद्यापेक्षा वर मानले गेले, तर सामान्य नागरिकांचा न्यायावरील विश्वास डळमळतो. भारतातही अनेकदा प्रभाव, पैसा आणि राजकीय पाठबळामुळे तपासाच्या दिशांवर प्रश्न उपस्थित होतात. म्हणूनच तपास यंत्रणांची स्वायत्तता, न्यायव्यवस्थेची पारदर्शकता आणि माध्यमांची निर्भयता, हे तीन स्तंभ मजबूत ठेवणे अत्यावश्यक आहे. एपस्टीन फाईल्समधील सर्व सत्य कधी पूर्णपणे बाहेर येईल का, हा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे. काही कागदपत्रे सार्वजनिक झाली, काही नावे समोर आली; परंतु अनेक धागे अजूनही अंधारात असल्याची भावना कायम आहे. न्याय केवळ न्यायालयीन निर्णयाने पूर्ण होत नाही; तो समाजाच्या विश्वासातून पूर्ण होतो. सत्तेच्या सावल्यांत लपलेले सत्य बाहेर आणण्यासाठी धैर्यवान पत्रकार, प्रामाणिक तपास अधिकारी, स्वतंत्र न्यायव्यवस्था आणि जागरूक समाज, या चौघांची गरज असते. एपस्टीन फाईल्सने जगाला धक्का दिला आहे; आता हा धक्का जागृतीत बदलणे आपल्याच हातात आहे. कारण शेवटी, लोकशाही टिकते ती घोषणांनी नव्हे तर निर्भय सत्यशोधाने.

# कामगार-विरोधी नवे चार कामगार कायदे तत्काळ रद्द करा : इंटकचे जिल्हाध्यक्ष जमाले

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक)च्या वतीने आज जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे कामगार, कर्मचारी व सर्वसामान्य जनतेच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी एकदिवसीय आंदोलन यशस्वीरीत्या पार पडले. केंद्र शासनाने कोणतीही पूर्वचर्चा न करता लागू केलेल्या चार नवीन कामगार संहितांच्या निषेधार्थ तसेच कामगारविरोधी धोरणे व कायदे मागे घेण्याच्या मागणीसाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आले होते. या आंदोलनात विविध कामगार संघटना, कर्मचारी संघटना, आशा, अंगणवाडी, एमडीएम कर्मचारी तसेच इतर क्षेत्रातील कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले.



आंदोलनादरम्यान निदर्शने, घोषणाबाजी व सभेद्वारे शासनाचे लक्ष वेधण्यात आले. त्यानंतर निवेदन सादर करून कामगारांच्या मागण्या शासनापर्यंत पोहोचविण्यात आल्या. प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे : चार नवीन कामगार संहिता तात्काळ रद्द कराव्यात. बियाणे विधेयक व वीज दुरुस्ती विधेयक मागे घ्यावेत. अणुऊर्जा क्षेत्रातील खाजगीकरणास प्रोत्साहन देणारी धोरणे रद्द करावीत. मनरेगा योजना बळकट करावी व संबंधित ग्रामीण कायदे मागे घ्यावेत. रोजगार व विमा क्षेत्रातील १००% थेट परकीय गुंतवणुकीचा निर्णय मागे घ्यावा. 'विकसित भारत शिक्षा अधिष्ठान विधेयक २०२५' मागे घ्यावे. सरकारी व सार्वजनिक क्षेत्रातील रिक्त पदे तात्काळ भरावीत. अंगणवाडी, आशा व एमडीएम कर्मचाऱ्यांना नियमित करून सरकारी कर्मचारी दर्जा द्यावा. एनएचएम डॉक्टर व कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवा द्यावी.

यावेळी इंटकचे जिल्हाध्यक्ष रामधन जमाले म्हणाले की, मागील दहा वर्षांत शासनाने घेतलेले अनेक निर्णय कामगारविरोधी असून उद्योगपतीधार्जिणे आहेत. नवीन कामगार संहितांमुळे कामगारांचे विद्यमान हक्क कमी होत असून कंत्राटीकरण व खासगीकरणाला चालना मिळत आहे. त्यामुळे रोजगार सुरक्षिततेवर गंभीर परिणाम होत आहे. शासनाने कामगार संघटनांशी सखोल चर्चा करूनच निर्णय घ्यावेत. कामगार, कर्मचारी व सर्वसामान्य जनतेच्या हक्कांसाठी आम्ही लोकशाही मार्गाने संघर्ष सुरू ठेवू. शासनाने आमच्या मागण्यांची तात्काळ दखल घ्यावी; अन्यथा पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल.

या आंदोलनात काँग्रेसचे दादासाहेब मुंडे,सखाराम बेंगडे (इंटक जिल्हा सचिव), संदीप झिंजुर्के (जिल्हा उपाध्यक्ष), मारुती आगाज, सद्दाम सकलेन शेख (उपतालुका अध्यक्ष, बीड), भीमराव कुटे, शेख आमेर पाशा (शेर-ए-हिंद संस्थापक), सेवानिवृत्त ईपीएस कर्मचारी समन्वय समितीचे विभागीय व जिल्हाध्यक्ष डॉ. संजय तांदळे, किसान सभेचे जिल्हाध्यक्ष प्राचार्य डी.जी. तांदळे, आप जिल्हाध्यक्ष व माजी सैनिक अशोक येडे, लेक लाडकी अभियानचे जिल्हाध्यक्ष बाजीराव ढाकणे, प्राचार्य राजकुमार कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

या आंदोलनात काँग्रेस-इंटक संघटना, ईपीएस ९५ पेन्शनर्स संघटना, किसान सभा, बांधकाम कामगार संघटना, लाल बावटा कामगार युनियन, असंघटित कामगार संघटना, आशा वर्कर्स युनियन, शालेय पोषण आहार संघटना, एसएफआय, डीवायएफआय, जनवादी महिला संघटना, शेर-ए-हिंद संस्था आदी विविध राष्ट्रीय स्तरावरील संघटनांचा सहभाग होता.

# अनुकंपा भरतीत गोंधळ!

## बीड जिल्ह्यात वरिष्ठता डावलून पदांची भरती केलेल्याची चौकशी व्हावी : बाबासाहेब खेमाडे

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात अनुकंपा तत्वावरील भरती प्रक्रियेत मोठा अन्याय होत असल्याचा गंभीर आरोप अनुकंपाधारकांकडून करण्यात येत आहे. शासनाने ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे अनुकंपा भरती ही वरिष्ठता (सिनिअरिटी) यादीप्रमाणे पारदर्शक पद्धतीने होणे अपेक्षित असताना, प्रत्यक्षात पदवीधर उमेदवारांची वरिष्ठता डावलून पुढील क्रमांकाच्या उमेदवारांना संधी देण्यात आल्याने वरिष्ठता तुटल्याचा आरोप समोर आला आहे.



अनुकंपाधारकांचे म्हणणे आहे की वरिष्ठता तुटली आहे असे प्रशासनाकडून सांगितले जाते, मात्र यावर कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने अनेक गरजू कुटुंबांना वर्षानुवर्षे प्रतीक्षा करावी लागत आहे. याशिवाय काही ठिकाणी पदनिहाय भरती न करता फक्त शैक्षणिक अर्हतेच्या आधारे जागा भरल्या गेल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे पदनिहाय नियमांची पायमल्ली होत असून भरती प्रक्रियेबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. दरम्यान, सामाजिक कार्यकर्ता बाबासाहेब खेमाडे यांनी या प्रकरणाची सविस्तर माहिती व कागदपत्रे गोळा करून आराखडा तयार केला असून ते सातत्याने या विषयावर लक्ष ठेवून आहेत. त्यांनी अनुकंपाधारकांचे प्रश्न प्रशासनासमोर मांडण्यासाठी पाठपुरावा सुरू केला आहे. अनुकंपाधारकांनी कार्यालयीन कामकाजावरही नाराजी व्यक्त केली असून, अनेक वेळा अधिकारी अनुपस्थित राहत असल्याचा आरोप केला आहे. विचारणा केल्यास ऑनलाईन बघा किंवा पुढच्या महिन्यात समजेल अशी उत्तरे देऊन टाळाटाळ केली जाते, असेही सांगण्यात आले. तसेच कोरोना काळात सेवा दिलेल्या कर्मचाऱ्यांना व ऑन-ड्युटी मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना शासनाकडून प्राधान्य मिळते का, याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. रिक्त पदांची माहिती लपवली जाते का? विभागांकडून अहवाल वेळेत दिला जात नाही? अनुकंपाधारकांनी आणखी आरोप केला की, जिल्ह्यातील विविध विभागांमध्ये किती पदे रिक्त आहेत, किती भरली गेली आहेत आणि किती पदे प्रलंबित आहेत, याचा अहवाल वेळेत सादर केला जात नाही.

अनुकंपाधारकांनी जिल्हाधिकारी महोदयांनी या प्रकरणात लक्ष घालून वरिष्ठता यादीप्रमाणे पारदर्शक भरती करावी, रिक्त पदांचा अहवाल मागवावा आणि नियमबाह्य नियुक्त्यांची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. अनुकंपाधारकांच्या प्रमुख मागण्या वरिष्ठता यादीला १००% प्राधान्य द्यावे. गट-क पदवीधर जागांवरील नियमबाह्य नियुक्त्या रद्द कराव्यात. सर्व विभागांनी रिक्त पदांचा अहवाल वेळेत सादर करावा. कोरोना वॉरियर्स व ऑन-ड्युटी मृत्यू प्रकरणांना प्राधान्य द्यावे. कार्यालयीन दिरंगाई थांबवावी. गैरव्यवहार आढळल्यास दोषींवर कठोर कारवाई करावी.

# एस.एम.युसूफ यांच्यामुळे पत्रकारितेची प्रेरणा मिळाली : इमरोज शेख

## पत्रकारिता क्षेत्रातील तपपुर्ती निमित्ताने हृदयी सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

बीड न्यूज आपतक या हिंदी न्यूज चैनल चे मुख्य संपादक तथा आज़ाद पत्रकार इमरोज़ शरीफ शेख यांनी शहरातील ज्येष्ठ मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील तपपुर्ती निमित्ताने हृदयी सत्कार करताना वरील उद्गार काढले.



सत्कार प्रसंगी बोलताना इमरोज शेख पुढे म्हणाले की, गेल्या काही वर्षांपासून विविध वृत्तपत्रातून एस.एम.युसूफ़ यांच्या बातम्या व लेख सातत्याने वाचायचो आणि वाचत आहे. ते करीत असलेल्या लिखाणातून वाचणाऱ्यांच्या ज्ञानात व माहितीत भर पडते. शिवाय त्यांनी उचललेला प्रत्येक मुद्दा हा जमिनीशी संलग्न असतो. समाजातील दीनदलित, गोरगरीब, सर्वसामान्यांना भेडसावणाऱ्या समस्या असो की प्रश्न असो, त्यांच्या दृष्टीस पडले की, ते त्याच्यावर लिखाण केल्याशिवाय राहत नाहीत. त्यांची ही खुबी पाहूनच खरे तर मला पत्रकार होण्याचा हुरूप आला. पत्रकार होण्यामागे त्यांच्या लिखाणातून मिळालेली मोठी प्रेरणा आहे. त्यांनी नुकतेच पत्रकारिता क्षेत्रात बारा वर्ष पूर्ण केले आहेत. या अनुषंगाने त्यांच्या तपपूर्ती निमित्त माझ्याकडून एक छोटासा सत्कार करतोय असे म्हटले.

# चौसाळा सार्वजनिक शिवजयंतीच्या अध्यक्षपदी बाळासाहेब जोगदंड तर उपाध्यक्षपदी सुधीर शिंदे



**बीड । प्रतिनिधी**

प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षी देखील चौसाळा येथील सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने चौसाळा ग्रामपंचायत कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्षपदी बाळासाहेब कुंडलीक जोगदंड, उपाअध्यक्षपदी सुधिर (भैय्या) शिंदे, कोषाध्यक्षपदी पत्रकार विवेक (बाबा) कुचेकर तर सचिवपदी सुहास (मुन्ना) झोडगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या बैठकीस सयाजी (बप्पा) शिंदे, माजी सरपंच राजेश (अप्पा) नाईकवाडे, माजी सरपंच राम कुचेकर, नानासाहेब फौजी शिंदे, दत्तात्रय कमलाकर नाईकवाडे, तुकाराम जोगदंड, नंदु आबा जोगदंड, पोपट बप्पा शिंदे, दिपक झोडगे, पवन कुचेकर, प्रविण भैय्या शिंदे, शैलेश जोगदंड, लखन सोनवणे, रंजित शिंदे, राम जोगदंड, सलीमभाई जहागिरदार, संतोष सोनवणे, विकास जोगदंड, विष्णु अण्णा कळासे, आलिम शेख यांच्यासह असंख्य शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मला वाचवा, मी स्वर्गीय विनायक मेटे साहेबांच्या फंडातून गोरगरिबाच्या पिण्यासाठी बांधलेली टाकी आहे : शेख युनूस

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील सिटी हॉटेल च्या बाजूला गोरगरिबाना पाणी पिता यावे, यासाठी शिवसंग्राम पक्षाचे संस्थापक स्वर्गीय आ. विनायक राव जी मेटे साहेब यांच्या फंडातून बांधण्यात आलेली टाकी काही लोक जाणून बुजून त्याला पाडण्यासाठी दररोज थोडं थोडं करून पाडायचा प्रयत्न करीत आहे.




तरी प्रशासनाला व नगरपरिषद ला तसेच शिवसंग्राम पक्षाच्या अध्यक्षा श्रीमती ज्योतीताई मेटे यांना विनंती आहे की त्यांनी या टाकीची दुरुस्ती करावी व येणारा काळ हा उन्हाळ्याचा असून गोरगरिबांना त्यापासून पाणी पिण्यासाठी मदत होईल. आणि स्वर्गीय विनायक मेटे साहेबांच्या आत्म्याला शांती मिळेल. त्यासाठी लवकरात लवकर ही टाकी दुरुस्ती व्हावी ही अपेक्षा गोरगरीब जनतेची आहे.

# अभिजीत पायके यांची ऑल इंडिया पँथर सेनेच्या युवा तालुकाध्यक्षपदी निवड



**वडवणी । प्रतिनिधी**

अभिजीत अर्जुन पायके यांची ऑल इंडिया पँथर सेनेच्या वडवणी युवा तालुकाध्यक्ष निवड करण्यात आली या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. पदाधिकारी निवडीचा कार्यक्रम वडवणी येथील शिवाजी चौकात उत्साहात पार पडला या कार्यक्रमाला संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष समाजभूषण दिपक केदार तसेच महाराष्ट्र प्रवक्ता तथा बीड जिल्ह्याअध्यक्ष नितीन सोनवणे यांची प्रमुख उपस्थित होते.

त्यांचे हस्ते अभिजित पायके यांना निवडीचे पत्र प्रदान करण्यात आले यावेळी उपस्थित वडवणी तालूका अध्यक्ष त्र्यंबक पायके आणि इतर मान्यवरांनी अभिजीत पायके यांना शुभेच्छा देत संघटना बळकट करण्यासाठी आणि युवकांच्या प्रश्नांसाठी सक्रियपणे काम करण्याचा विश्वास व्यक्त केला. वडवणी तालुक्यातील संघटनात्मक बांधणी अधिक मजबुत करुन सामाजिक कार्यात पुढाकार घेण्याचा निर्धार नुतन तालुकाध्यक्षांनी केला. कार्यक्रमास संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# दीपा मुधोळकर यांच्या उपस्थितीत व्यसनमुक्ती कार्यशाळा



**बीड । प्रतिनिधी**

राज्यात विविध जिल्ह्यात व्यसनमुक्ती कार्यशाळा राबविण्यात आले आहे. यानंतर पुणे येथे बीडच्या तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांच्या उपस्थितीत व्यसनमुक्ती कार्यशाळेचा समारोप करण्यात आला.

महाराष्ट्रात विविध जिल्ह्यात व्यसनमुक्ती कार्यशाळा राबवण्यात आल्या राज्यातील विविध ठिकाणी राबविण्यात आलेल्या व्यसनमुक्ती कार्यशाळेनंतर पुणे येथे व्यसनमुक्ती कार्यशाळा घेण्यात आली हा कार्यक्रम बीडच्या तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळकर यांच्या उपस्थितीत पार पडला. आजचा तरुण व्यसनाधीन कडे वळत आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या वतीने तरुणांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी शासन आणि सामाजिक संस्थेच्या माध्यमातून व्यसनमुक्ती कार्यशाळा राबवण्यात येत आहे या कार्यशाळेच्या माध्यमातून तरुणांनी व्यसनापासून दूर करावे यासाठी मार्गदर्शन केले जाते समारोपीय कार्यशाळा पुणे येथे पार पडली असून या कार्यशाळेत दीपा मुधोळकर यांनी उपस्थित यांना मार्गदर्शन केले यावेळी बीड येथील आधार व्यसनमुक्ती केंद्राचे तेजस घुमरे, संजय भडगळ सह राज्यातील विविध सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.



काळकुटे पाटील व सावंत पाटील यांच्या रिसेप्शन कार्यक्रमास सदिच्छा भेट दिली असता तेथे आमचे मार्गदर्शक, स्नेही शरदजी जरे (सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती मुंबई/अप्पर निबंधक महाराष्ट्र राज्य पुणे) यांच्या भेटीचा योग आला. यावेळी सोबत उपस्थित मान्यवर.

## 'स्व. गोविंदराव (नाना) वाघ यांच्या जयंतीनिमित्त' आंतरशालेय रंगभरण स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संस्थेचे संस्थापक सचिव शिक्षणमहर्षी स्व.गोविंदराव (नाना) वाघ यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी भव्य आंतरशालेय रंगभरण स्पर्धेचे शनिवार, १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९.०० ते १०.०० या वेळेत बीड शहरातील यशवंत विद्यालय व शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालय या केंद्रांवर मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत आपली कलात्मकता सादर केली.

छत्रपती छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा आणि यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन शिक्षण क्षेत्रात संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे शिक्षणमहर्षी स्व. गोविंदराव (नाना) वाघ यांच्या जयंती निमित्ताने आंतर शालेय रंगभरन स्पर्धा शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. गणेश वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. बीड शहरातील यशवंत विद्यालयात झालेल्या स्पर्धेत बीड शहरातील १९ शाळांनी सहभाग नोंदवला. तसेच ३२५ विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेच्या माध्यमातून शिक्षणमहर्षी स्व. गोविंदराव वाघ यांच्या कार्याची आठवण जागवण्यात आली. या स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ गुरुवार, दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता संबंधित केंद्रांवर करण्यात येणार आहेत. या स्पर्धेसाठी मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत जि प प्रा शा कवडगाव ने पटकावला द्वितीय क्रमांक

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा कवडगाव यांनी मुख्यमंत्री माझी शाळा या स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला आहे महाराष्ट्र शासनातर्फे राबविण्यात आलेल्या मुख्यमंत्री माजी शाळा सुंदर शाळा टप्पा ३.० अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कवडगाव मराठी यांनी तालुक्यात द्वितीय क्रमांक प्राप्त करीत उल्लेखनीय यश संपादन केले आहे या अभियानात वडवणी तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता.



याबाबत अधिक माहिती अशी की २०२५ २६ मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान ३.० यात तालुकास्तरीय मूल्यमापन झाल्यानंतर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कवडगाव शाळेची तालुकास्तरीय दुसऱ्या क्रमांकाने निवड झालेली आहे. वडवणी तालुक्यातून कवडगाव शाळेला दुसरा क्रमांक प्राप्त झाल्यामुळे संपूर्ण गाव व परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळेच्या सर्व शिक्षकांनी या स्पर्धेमध्ये भरघोस असे योगदान देऊन शाळेचे सुशोभीकरण, परिसर स्वच्छता, मैदान आखणी, परसबाग अशा भौतिक सुविधेमध्ये तसेच विद्यार्थी सहभाग विद्यार्थी गुणवत्ता, संपादन व पातळी अशा विविध बाबींमध्ये जास्तीत जास्त गुण संपादन करून शाळेने या स्पर्धेमध्ये बक्षीस खेचून आणले, या यशामध्ये शाळेचे मुख्याध्यापक श्री पठाण सर, शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री अहिरे सर, मस्के सर, शिंदे सर, टकले सर, येडे सर व खांडेकर मॅडम या सर्वांनीच सक्रिय सहभाग घेऊन, सर्वांच्या संघ भावनेमुळे व सहकार्यामुळे हे यश संपादन झाले. तसेच या संपूर्ण अभियानात तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री बाबासाहेब उजगरे साहेब, केंद्राचे केंद्रप्रमुख श्री सुरेश जी करांडे साहेब यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले, त्यांच्या सूचनांमुळेच व प्रेरणेमुळेच शाळेला योग्य अशी दिशा मिळाली आणि दर्जेदार काम साकार झाले. शाळेच्या या यशामुळे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शेख समद जहांगीर, उपाध्यक्ष परमेश्वर काळे इतर सर्व सदस्य तसेच गावकरी मंडळी यांनी शाळेतील शिक्षकाचे मनःपूर्वक अभिनंदन केले. गावातील नागरिकांनी शाळेच्या यशासाठी कौतुक करत पुढील उपक्रमांसाठी ही सहकार्य करण्याचा मनोदय यावेळी व्यक्त केला. मुख्याध्यापकांनी शिक्षक वृंद तसेच शाळे व्यवस्थापन समिती व गावकऱ्यांचे याबद्दल आभार मानत पुढील वर्षी या स्पर्धेमध्ये निश्चितपणे प्रथम क्रमांक मिळवू असा आशावाद यावेळी व्यक्त केला, या उल्लेखनीय यशाबद्दल जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कवडगाव शाळेचा लौकिक वाढला असून तालुक्यात शाळेचे नाव झाले आहे.

# रयत सामाजिक प्रतिष्ठानकडून पसायदान अनाथ आश्रमात फळवाटप



## विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटली आनंदाची झळाळी

**बीड । प्रतिनिधी**

रयत सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत पसायदान अनाथ आश्रमातील विद्यार्थ्यांना फळवाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. प्रतिष्ठानचे मार्गदर्शक आर. जी. माने यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. समाजातील गोरगरिब, गरजू विद्यार्थी आणि वंचित घटकांसाठी सातत्याने विविध मदतकार्य करणाऱ्या रयत सामाजिक प्रतिष्ठानने यावेळी पसायदान अनाथ आश्रमातील विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून त्यांना पौष्टिक फळांचे वाटप केले. याबाबत आश्रमाचे संचालक गोवर्धन दराडे यांच्याशी चर्चा करून हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

फळवाटप कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. सामाजिक कार्यातून विद्यार्थ्यांना आधार देण्याचा आणि त्यांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले. या कार्यक्रमास संदीप कुलकर्णी, भागवत शेळके, गणेश माने, उदय देशमुख, प्रमोदजी रामदासी, संग्राम माने, रुद्र माने, सोनू कावरे, श्रेयश बोंगाणे तसेच रयत सामाजिक प्रतिष्ठानचे सर्व सदस्य उपस्थित होते. समाजातील गरजू घटकांसाठी अशा प्रकारचे उपक्रम पुढेही सुरू ठेवण्याचा निर्धार प्रतिष्ठानने व्यक्त केला.

# ८३ कोटीच्या विकास कामावर १६ नगरसेवकांचा आक्षेप

## पाईपलाईन काम तात्काळ थांबवण्याची मागणी; अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

**माजलगाव । शेख अखिल**

नगरपालिका निवडणुकीपासून ते विषय समित्यांच्या निवडीपर्यंत माजलगाव पालिकेत राजकीय घडामोडींची मालिका सुरूच आहे. आता आमदार प्रकाश सोळंके गट आणि' तुतारी'चे मोहन जगताप गटातील एकूण १६ नगर सेवकांनी सुमारे ८३ कोटी रुपयांच्या विकासकामांवर गंभीर आक्षेप नोंदवत मुख्याधिकारी सुंदर बोंडा यांच्याकडे लेखी तक्रार दिली आहे. त्यामुळे पालिकेच्या कारभाराबाबत शहरात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नगरसेवकांनी दिलेल्या निवेदनात मे. संतोष कन्स्ट्रक्शन, नांदेड यांच्या माध्यमातून सुरू असलेले पाईपलाईनचे काम तात्काळ बंद करण्याची मागणी केली आहे. आक्षेपांमध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, रस्ते उखडून पाईपलाईन टाकल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शासनाच्या योजनेनुसार पाणीपुरवठा जोडणी मोफत देण्याचा संकल्प असताना कंत्राटदार नागरिकांकडून प्रत्येकी १५०० रुपये घेत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. याबाबत चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. होल्डिंग टेस्टिंगपूर्वी नळजोडणी देणे शासकीय नियमात बसत नसल्याचा आरोप करत भविष्यात शेवटच्या घरापर्यंत पाण्याचा पुरेसा दाब पोहोचणार नाही, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे.

**८३ कोटी रुपयांच्या विकासकामांवर १६ नगरसेवकांचा लेखी आक्षेप**

पाईपलाईनचे काम तात्काळ थांबवण्याची मुख्याधिका-यांकडे मागणी. कंत्राटदाराकडून नागरिकांकडून १५०० रुपये वसुलीचा आरोप, चौकशीची मागणी. होल्डिंग टेस्टिंगपूर्वी नळजोडणी देत असल्याचा आक्षेपः भविष्यात पाण्याचा दाब कमी राहण्याची भीती. दर्जाहीन व कमी लांबीचे पाईप पुरवठ्याचा आरोप. नुकतेच झालेले सिमेंट रस्ते फोडू नयेत, दोषदायित्व कालावधीचा मुद्दा उपस्थित. भूयारी गटार योजनेला मंजुरीनंतरच पाईपलाईनचे काम करावे, अशी मागणी. कामे न थांबवल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा. विषय समित्यांची निवड दोन महिन्यांपासून रखडलेली. एका बैठकीत ३५ विषय मांडल्याने प्रशासनावर स्थानिक नेत्यांची नाराजी.




**विषय समित्यांचा निर्णय रखडला**

नगराध्यक्षांनी पदभार स्वीकारल्यानंतर १५ दिवसांत विषय समित्या जाहीर करणे अपेक्षित असते. मात्र अंतर्गत राजकीय पेच आणि गटबाजीमुळे दोन महिन्यांनंतरही विषय समित्यांची घोषणा झालेली नाही. त्यामुळे पालिकेतील प्रशासनिक कामकाजावर परिणाम होत असल्याचे दिसून येते. आली आहे. तसेच नागरिकांना देण्यात येणारे पाईप कमी लांबीचे व दर्जाहीन असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

ज्या ठिकाणी सिमेंट रस्ते नुकतेच झाले आहेत, त्या ठिकाणी दोषदायित्व कालावधी संपण्यापूर्वी रस्ते फोडू नयेत, अशी मागणीही करण्यात आली आहे. मागील पाच वर्षांत ज्या भागात नवीन पाईपलाईन टाकण्यात आली आहे, त्या भागात पुन्हा काम करण्याची गरज काय, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. शहरात भूयारी गटार योजनेचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत विचाराधीन असल्याने त्यास मंजुरी मिळाल्यानंतरच पाईपलाईनचे काम करावे, अशीही मागणी आहे. विविध ठिकाणी पाईपलाईनसाठी खोदलेले क्रॉसिंग तात्काळ दुरुस्त करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

**मुख्याधिकाऱ्यांवर प्रश्नांची सरबत्ती**

अलीकडील बैठकीत प्रशासनाने एकाच वेळी सुमारे ३५ विषय मांडल्याने काही स्थानिक नेत्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. आगामी पाच वर्षात पुन्हा बैठक घ्यायची नाही का, असा सवाल उपस्थित करत मुख्याधिकाऱ्यांना जाब विचारण्यात आला. त्यावर मुख्याधिकाऱ्यांनी विषय नगराध्यक्षांच्या अधिकारक्षेत्रातील असल्याचे स्पष्ट केल्याची माहिती सूत्रांनी दिली. एकूणच ८३ कोटीच्या विकासकामांवरून पालिकेत पुन्हा एकदा राजकीय संघर्ष उफाळून आला असून त्याचे परिणाम थेट नागरिकांवर होण्याची चिन्हे आहेत.

वरील सर्व आक्षेपांचा विचार करून सुरू असलेली कामे थांबवावीत, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा नगरसेवकांनी दिला आहे. निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस (कर्नेडीस गट) गटनेते इमरान खान, नगरसेवक शरद यादव, नीला इतापे, सुचिता होके, गंगा भोसले, विजय जगताप तसेच आमदार प्रकाश सोळंके गटावे राज सय्यद अहमद, राहुल लंगडे, शेख महीन अहमद, रेहानाबी शेख, सय्यद रफीक अली, वैशाली भेटे, विजय शिंदे, रेखा सरोदे, डॉ. सचिन देशमुख, पठाण आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. या तक्रारीमुळे सुरू असलेल्या कामांवर परिणाम होण्याची शक्यता असून खोदलेले रस्ते, धुळीचे प्रदूषण व वाहतुकीच्या अडचणींचा सामना नागरिकांना करावा लागणार आहे.

# कॉपीमुक्त अभियान राबविणाऱ्या शिक्षण विभागाच्या दिव्याखाली अंधार

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने इयत्ता १२ वीच्या परीक्षेला दि. १० पासून सुरुवात झाली आहे. बीड जिल्ह्यातील १०३ परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही, कंट्रोल रूम तसेच संवेदनशील केंद्रांवर ड्रोन कॅमेऱ्याद्वारे देखरेख ठेवून भयमुक्त व कॉपीमुक्त परीक्षा घेण्याचा दावा जिल्हा प्रशासन करत आहे. मात्र प्रत्यक्षात परळी तालुक्यातील नाथ शिक्षण संस्था संचलित यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालय प्रकरणामुळे शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

परळी शहरात परीक्षा केंद्र असल्याचे बोर्डाकडे नमूद करण्यात आले असताना प्रत्यक्षात परीक्षा जिरेवाडी येथील शारदा विद्या मंदिर (माध्यमिक व प्राथमिक शाळा) येथे घेण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे या ठिकाणी परीक्षा घेण्यासाठी कोणतीही अधिकृत परवानगी नसल्याचा आरोप होत आहे. बोर्ड परीक्षा आयोजित करण्यासाठी तब्बल १२० शालेय विद्यार्थ्यांना सुट्टी देण्यात आली, यामुळे शिक्षण व्यवस्थेचा गंभीर गैरवापर झाल्याचे स्पष्ट झाले आहे.



**अधिकाऱ्यांनाच परीक्षा केंद्र बदलल्याची माहिती नाही**

या प्रकरणातील धक्कादायक बाब म्हणजे परीक्षा केंद्र बदलल्याची माहिती जिल्हा प्रशासन व शिक्षण विभागाला नव्हती. शिक्षण विभागाचे अधिकारी गिरी यांनी याबाबत अज्ञान व्यक्त केल्याने प्रशासकीय हलगर्जीपणा आणि निष्काळजीपणा उघड झाला आहे.

**कॉलेज बोगस; स्वतःची इमारत व अधिकृत सुविधा नाहीत**

नाथ शिक्षण संस्था संचलित यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयाला स्वतःची अधिकृत इमारत नसून, रहिवासी इमारतीवर कॉलेजचा फलक लावण्यात आला आहे. केवळ दोन शटर असलेल्या खोलीला कॉलेज कार्यालय म्हणून दाखवण्यात आले आहे. शहरात कॉलेज व परीक्षा केंद्र दाखवून ग्रामीण भागात परीक्षा आयोजित करणे हा गंभीर नियमभंग असल्याचे स्पष्ट होत आहे.

**दोषींवर कठोर कारवाईची मागणी**

या प्रकरणात संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य अतुल दुबे, माध्यमिक मुख्याध्यापक अश्विनी बाळासाहेब वानखेडे, प्राथमिक मुख्याध्यापक अंबादास आघाव, सचिव राजश्री मुंडे आणि सहसचिव प्रदीप शिवाजी खाडे यांच्यावर सखोल चौकशी करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केली आहे.

**शिक्षण विभागातील गैरव्यवहारांचे सत्र सुरूच**

यापूर्वी बीड जिल्हा परिषदेचे माजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) गैरव्यवहार प्रकरणात निलंबित झाले असून, विद्यमान शिक्षणाधिकारी (प्राथमिक) थकीत वेतन घोटाळ्यात सहआरोपी म्हणून जामिनावर आहेत. तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याविरोधात विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत चौकशी सुरू आहे. त्यामुळे भयमुक्त व कॉपीमुक्त परीक्षा घेण्याचा दावा करणाऱ्या शिक्षण विभागाचा कारभार 'दिव्याखाली अंधार' असल्याची तीव्र प्रतिक्रिया डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केली असून, संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

# चेक बाऊन्स प्रकरणी माजलगाव न्यायालयात आरोपीला सहा महिने कारावास आणि २.८० लाखांचा दंड

**माजलगाव । शेख अखिल**

विहिरीच्या खोदकामाची थकीत रक्कम देण्यासाठी दिलेला चेक हेतुपुरस्सर स्वाक्षरी बदलून अमान्य केल्याप्रकरणी, माजलगाव येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी राहुल पौळ यांनी आरोपीला दोषी ठरवत सहा महिने कारावास आणि २ लाख ८० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

या प्रकरणाची सविस्तर माहिती अशी की, फुले पिपळगाव येथील 'फेमस अर्थमूव्हर्स'चे मालक शेख शफीक शेख हसन यांनी मौजे लोणगाव येथील भागवत बाबासाहेब आलाट यांच्या सांगण्यावरून हुंडाई २१० मशीनच्या सहाय्याने विहिरींचे खोदकाम केले होते. या कामाचे २ लाख रुपये थकीत असल्याने आरोपीने फिर्यादीस त्या रकमेचा चेक दिला होता. मात्र, सदर चेक बँकेत वटवण्यासाठी टाकला असता, खातेदाराने आपली स्वाक्षरी जाणीवपूर्वक बदलल्यामुळे तो वटू शकला नाही, असा लेखी मेमो बँकेने दिला.

या फसवणुकीबाबत फिर्यादीने ॲड. खलील शेख यांच्यामार्फत कायदेशीर नोटीस पाठवूनही आरोपीने रक्कम अदा केली नाही. शेवटी फिर्यादीने माजलगाव न्यायालयात मागितली. खटल्यादरम्यान फिर्यादी पक्षाचे वकील खलील शेख यांनी प्रबळ साक्ष-पुरावे आणि प्रभावी युक्तिवाद सादर केला. आरोपीचा बचाव खोटा असल्याचे सिद्ध करत त्यांनी जास्तीत जास्त शिक्षेची मागणी केली. न्यायालयाने सर्व पुरावे ग्राह्य धरून १३ फेब्रुवारी २०२६ रोजी निकाल दिला. यामध्ये आरोपी भागवत आलाट यास सहा महिने साधी कैद आणि २ लाख ८० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली असून, दंडाची संपूर्ण रक्कम नुकसानभरपाई म्हणून फिर्यादीस देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या यशस्वी निकालामुळे खलील शेख यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# तालुका कामगार सुविधा केंद्र, बीड येथे भ्रष्टाचाराचा स्फोट

## पैसे द्या – फॉर्म मंजूर; पैसे नका देऊ – त्रुटी दाखवा असा उघड धंदा?

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील तालुका कामगार सुविधा केंद्र, बीड येथे कार्यरत काही डेटा एंट्री ऑपरेटर यांच्यावर अतिशय गंभीर आणि धक्कादायक आरोप समोर येत आहेत. कामगारांकडून उघडपणे पैसे घेऊनच अर्ज मंजूर केले जात असल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस येत आहे.

कामगारांचे स्पष्ट म्हणणे आहे की, ज्यांनी पैसे दिले त्यांचे फॉर्म सर्व मूळ कागदपत्र योग्य म्हणून तत्काळ मंजूर! आणि ज्यांनी पैसे दिले नाहीत, त्यांच्या अर्जांमध्ये मुद्दाम त्रुटी शोधून फाईल थांबवणे, वारंवार चकरा मारायला लावणे! हा प्रकार केवळ गैरप्रकार नाही, तर शासनाच्या योजनांवर उघड डाका आहे. गरीब, कष्टकरी बांधकाम कामगारांना मिळणाऱ्या हक्काच्या योजनांवर काही कर्मचाऱ्यांनी पैसे उकळण्याचा धंदा सुरू केला आहे का? असा थेट सवाल आता उपस्थित होत आहे.

**उघडा डोळे, पाहा काय सुरू आहे!**

सरकारी कामगार अधिकारी श्री. कोणाळे साहेब यांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालावे, अशी तीव्र मागणी होत आहे. कार्यालयात नेमके काय चालले आहे? कोणाच्या आशीर्वादाने हा प्रकार सुरू आहे? याची सखोल चौकशी व्हावी, अशी कामगारांची मागणी आहे.

**निलंबन नाही तर आंदोलन!**

सदर प्रकरणात दोषी आढळणाऱ्या कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करावे किंवा तत्काळ बदली करावी अन्यथा कामगार रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करतील, असा इशारा देण्यात आला आहे. कामगार सुविधा केंद्र हे कामगारांच्या न्यायासाठी आहे, भ्रष्टाचारासाठी नाही. जर प्रशासनाने वेळेत कारवाई केली नाही, तर हा मुद्दा जिल्हास्तरावरच नव्हे तर राज्यस्तरावर नेला जाईल, असा इशाराही कामगारांनी दिला आहे. गरीब कामगारांच्या घामावर पैसे कमावणाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे, अशी संतप्त प्रतिक्रिया सर्वत्र उमटत आहे.

# शेख बिलाल व वकील सर यांच्या पाठपुराव्याला यश; गरिबांसाठी भव्य 'शादीखाना' उभारणार

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराच्या ऐतिहासिक वैभवाचा साक्ष असलेल्या 'डाक बंगला' इमारतीला आता पुन्हा एकदा ऊर्जितावस्था प्राप्त होणार आहे. वॉर्ड क्र.१७ चे नगरसेवक शेख बिलाल आणि वकील सर यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस व माजी मंत्री अमरसिंह पंडित यांनी या इमारतीच्या नूतनीकरणासाठी मंजुरी जाहीर केली आहे. याठिकाणी सर्वसामान्यांसाठी माफक दरात अत्याधुनिक सोयीसुविधांनी युक्त 'शादीखाना' (लग्नघर) उभारण्यात येणार आहे. आसफ जाही सल्तनत काळातील हा डाक बंगला एकेकाळी ऐतिहासिक सभा, मुशायरे आणि शैक्षणिक चळवळींचे केंद्र होता. मात्र, गेल्या काही काळापासून ही इमारत दुरवस्थेत होती.

फलकनुमा चौक येथे आयोजित सल्लागार बैठकीत बोलताना अमरसिंह पंडित म्हणाले की, डाक बंगल्याचे नूतनीकरण करून त्याला भव्य स्वरूप दिले जाईल. येथे चोवीस तास वीज उपलब्ध राहण्यासाठी आधुनिक सोलर पॅनेल बसवले जातील. हे लग्नघर विशेषतः गरीब व गरजू जनतेसाठी अत्यंत रास्त दरात उपलब्ध करून दिले जाईल. लोकप्रतिनिधी आणि मान्यवरांची उपस्थिती नगरसेवक शेख बिलाल यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच या इमारतीच्या नूतनीकरणाची आणि त्याचे लग्नघरात रूपांतर करण्याची आग्रही मागणी केली होती. या मागणीला उपस्थित सर्व नगरसेवक आणि नागरिकांनी उत्स्फूर्त पाठिंबा दिला.





या कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर अमरसिंह पंडित (माजी मंत्री व सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस) शेख बिलाल (नगरसेवक, वॉर्ड क्र.१७) सय्यद मोईनुद्दीन मास्टर व सय्यद सादिक अली (ज्येष्ठ नगरसेवक) फारुख पटेल (गटनेते, राष्ट्रवादी काँग्रेस पालिका) शेख निजाम जैनुद्दीन (सभापती) कमरूउल इमान खान (जिल्हाध्यक्ष, समाजवादी पार्टी) शेख मुजीब भाई (संपादक, दै. सिटीजन) शेख वकील सर (सचिव, सर सय्यद शाळा) आणि सिद्दीक मास्टर तसेच अशफाक इनामदार, इलियास भैय्या, बब्बू भाई, शेख अफसर, अफसर खान, रोहील दादा, महेश धांडे, बरकत लाला पठाण यांच्यासह अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीड शहरात नागरी मुलभूत सुविधांचा बोजवारा

## तातडीने सुविधा देण्यासाठी नगरपालिकेने पावले उचलावी : हाफेज अश्फाक

**बीड । प्रतिनिधी**




शहरातील मुलभूत नागरी सुविधांचा बोजवारा उडाला असून, विशेष म्हणजे प्रभाग क्रमांक २२,२३ आणि २४ या भागात बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. तोंडावर मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना असून या भागात वेळेवर पाणीपुरवठा करण्यात यावा तसेच पथदिवे, स्वच्छता या समस्या सोडविण्यासाठी नगरपालिका प्रशासनाने पावले उचलावीत अशी मागणी माजी सभापती शेख बिस्मील्लाबी पाशामियाँ आणि हाफेज अश्फाक यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

पवित्र रमजान महिना अवघ्या दोन दिवसांवर आला आहे. या महिन्यात मुस्लिम बांधव पूर्ण एक महिना निरंकार रोजा ठेवतात, त्यात आता उष्णता वाढू लागली असल्याने नगरपालिका प्रशासनाने गैरसोय होऊ न देता पूर्ण शहरासह प्रभाग क्रमांक २२,२३ आणि २४ या भागात वेळेवर आणि पुरेसा पाणीपुरवठा करावा, स्वच्छता आणि नियमित घंटागाडी सुरु करावी, पथदिवे बसविण्यात यावे, तसेच नम्रा कॉलनी, नुर शाह कॉलनी, मुनार शाहर कॉलनी, लियाखत मस्जिद परिसर बुस्टर पंपला येथील पाईप लाईन जोडून पाणी पुरवठा सुरू करण्यात यावा, जन्म-मृत्यू प्रमाणपत्राची वेबसाईट स्लो चालत आहे, त्यामुळे वेळेवर काम होत नाही. या वेबसाईट बाबत योग्य कार्यवाही करावी, इनामी जागेतील खरेदी-विक्री व्यवहाराद्वारे, जमिनी ज्यांच्या मालकी व ताब्यात असून जे राहत आहेत अशा नागरीकांच्या नावे बॉण्डआधारे पी.टी.आर. ला लावण्यात यावीत, बाबामिया इनामदार नगर, आरेफ अली नगर, नम्रा कॉलनी, फिरदोस कॉलनी, आरेफ शाह कॉलनी, लियाखत मस्जिद परिसर, अरिश मस्जिद परिसर, बुस्टर पंप परिसर, अहेमदिया मस्जिद परिसर, दुधाळ कॉलनी, बीड मामला, नुर शाह कॉलनी, मुतारशाह कॉलनी या भागामध्ये सिमेंट रस्ते व नालीचे काम तातडीने करावीत तसेच महावितरण कंपनीने रमजानच्या पार्श्वभूमीवर विजेचा लपंडाव न होऊ देता अखंडित वीजपुरवठा करावा यासह आदी मागण्या माजी सभापती शेख बिस्मील्लाबी पाशामियाँ, हाफेज अश्फाक यांनी नगराध्यक्ष बीड यांना निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी शेख जाफर इनामदार, सय्यद अनवर पाशा, हाजी अय्युब पठाण आदी उपस्थित होते.

# बीड न.प. स्थायी समिती बैठकीत डॉ.सारिका क्षीरसागरांनी मांडला शहर विकासाचा रोडमॅप

## विकास आराखड्यासंदर्भात अनेक प्रस्ताव केले सादर

## मूलभूत सुविधांसह शहरवासीयांच्या जिव्हाळ्याचे मांडले प्रश्न

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपरिषदेच्या स्थायी समितीची पहिली बैठक बुधवारी (दि.११) पार पडली असून या बैठकीत शहराच्या सर्वांगीण विकासासंबंधी विविध महत्त्वाचे मुद्दे चर्चेला आले. भाजपच्या गटनेत्या व स्थायी समिती सदस्या डॉ.सारिकाताई योगेश क्षीरसागर यांनी बीड शहरवासीयांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांसह भविष्यातील विकास आराखड्यासंदर्भात अनेक प्रस्ताव सभागृहासमोर मांडले.

नगराध्यक्ष प्रेमलता पारवे, समिती सभापती, सदस्यांच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीत डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी जिल्हा वार्षिक योजना २०२६-२०२७ अंतर्गत शहरातील विविध भागांमध्ये रस्ते व नाली बांधकामासाठी कामांची नावे सुचवली तसेच नगरपरिषद इमारतीवर सौरऊर्जा प्रकल्प बसवणे आणि हद्दवाढ भागात ५०० नवीन विद्युत खांब उभारण्यासाठी विद्युत मंडळाकडे प्रस्ताव पाठवण्याची मागणी केली. पाणी पुरवठा सुधारण्यासाठी धानोरा रोड मार्गे अमृतअटल योजना २.० अंतर्गत नवीन पाणीपुरवठा योजना प्रस्तावित करण्यासोबतच इदगाह पाण्याच्या टाकीजवळील गळती दुरुस्ती, हद्दवाढ भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा, पाइपलाइन नसलेल्या ठिकाणी बोअरवेल घेणे व नगरपरिषद इमारतीवर रेनवॉटर हार्वेस्टिंगची व्यवस्था करण्याचा मुद्दा मांडण्यात आला. तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत कंकालेश्वर, खंडेश्वरी देवी, राममंदिर, कोरडे गणपती, सोमेश्वर, दक्षिणमुखी हनुमान व विश्वेश्वर मंदिरासह विविध धार्मिक स्थळांच्या विकासाचे प्रस्ताव ठेवण्यात आले. बांधकाम व नगररचना विभागांतर्गत शहरातील महत्त्वाचे रस्ते, डीपी रोड, पुलांची कामे मार्गी लावणे, नवीन डीपी रोड प्रस्तावित करणे तसेच गुंठेवारी प्रक्रिया सुरू करण्याबाबत चर्चा झाली.



नागरी सुविधा मजबूत करण्यासाठी महिलांसाठी सार्वजनिक शौचालये, पुरुषांसाठी मुताऱ्या, नवीन स्मशानभूमी व कब्रस्थान, भाजी मंडई व फळ मार्केट उभारणे तसेच शहराच्या पश्चिम भागात नवीन अग्निशमन केंद्र उभारण्याची मागणी करण्यात आली. याशिवाय यशवंतराव चव्हाण उद्यानाचा विस्तार, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याची उंची वाढवून परिसर सुशोभिकरण, भिमसृष्टी येथे माता रमाई पुतळा उभारणी, छत्रपती संभाजी महाराज व उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांचे पुतळे उभारणे, बौद्ध विहार, चर्च, हज हाऊस उभारणी, फुलपाखरू उद्यान तयार करणे, शहरात ई-लायब्ररी सुरू करणे, बिंदुसरा व कर्परा नदी सुशोभिकरणासाठी डीपीआर तयार करून शासनाकडे पाठवणे तसेच तारांगण प्रकल्प सुरू करण्याचे प्रस्ताव मांडण्यात आले. नगरपरिषदेच्या मालकीच्या इमारतींच्या भाडे पुनर्रचनेद्वारे उत्पन्न वाढवण्याचा मुद्दा मांडण्यात आला, तर स्वच्छता विभागासाठी नवीन जेसीबी, कॉम्पॅक्टर, घंटागाड्या व ट्रॅक्टर खरेदी, प्लास्टिक मुक्ती अभियान, रस्त्यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड व नवीन उद्याने विकसित करण्यावर भर देण्यात आला. हद्दवाढ भागात आरोग्य केंद्र प्रस्तावित करण्यासोबतच शहरातील अनाधिकृत बॅनर व होर्डिंजवर कारवाई करण्याची मागणी डॉ.सारिका क्षीरसागर यांनी केली. यावेळी उपमुख्याधिकारी यांच्यासह सर्व विभागांचे प्रमुख अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.


**डॉ.सारिका क्षीरसागर बनल्या बीडकरांचा आवाज**

स्थायी समितीच्या पहिल्याच बैठकीत शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विभागनिहाय मांडण्यात आलेल्या प्रस्तावांमुळे आगामी काळात बीड शहराच्या विकासाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच, डॉ.सारिका क्षीरसागर या सातत्याने शहरवासीयांच्या समस्यांवर आवाज उठवत असून प्रत्यक्ष क्षेत्रात जाऊन प्रश्न सोडवित आहेत. यावरून त्या बीडकरांचा आवाज बनल्याचे चित्र दिसून येत आहे.

# मैसूरच्या वाघाला काही हिंदुत्ववादी संघटनेच्या द्वेष का ? शेख युनूस

**बीड । प्रतिनिधी**

टिपू सुलतान एक महान शासक आणि स्वतंत्र सैनिक होते. त्यांना म्हैसूरचा वाघ म्हणून ओळखले जाते. त्यांचा जन्म २० नोव्हेंबर १७५० रोजी कर्नाटकातील देवन हल्ली येथे झाला. त्यांच्या वडीलाचे नाव हैदर अली होते ते म्हैसूर साम्राज्याचे शासक होते. टिपू सुलतान यांना लहानपणापासूनच लष्करी शिक्षण देण्यात आले. ते एक कुशल सैन्य अधिकारी आणि शासक होते. त्यांनी फ्रांसीसी सेनेच्या संयोगाने आपली सेना आधुनिक करून सर्वात प्रथम रॉकेट तंत्रज्ञान वापर करून ब्रिटिशाविरुद्ध लढा दिला. आणि ब्रिटिशांना सडोकी पडो करून सोडले.





त्यांच्या काळात एक नवीन सिक्का प्रणाली, कॅलेंडर आणि भूमी राजवस प्रणाली सुरू केली. तसेच शेती आणि व्यापार यासाठी सिंचन पद्धती लागू केल्या आणि शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले. टिपू सुलतान हे ब्रिटिशाविरुद्ध लढताना श्रीरंगपट्टणम येथे शहीद झाले. ते नेहमी आक्रमक राहिले. त्यांच्या शौर्याने इंग्रजांना कधीही त्यांच्या साम्राज्याच्या विस्तार करण्यास सोपे गेले नाही. अशा शूरवीर टिपू सुलतान च्या मालेगाव मध्ये फोटो लावला म्हणून जर मोर्चे निघत असेल तर हे योग्य नाही. काही राजकारणी व हिंदुत्ववादी संघटना जाणून बुजून द्वेष निर्माण करण्याचे प्रयत्न करीत आहे. आणि माझी आणि मुस्लिम समाजाच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथागृहमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांना विनंती आहे की त्यांनी यासंदर्भात संबंधित संघटनावर बंदी घालावी, हीच समाजाची आपल्याकडून अपेक्षा आहे.

साप्ताहिक, विश्वनायक हे पत्र, प्रकाशक, मालक, संपादक, **शेख बिलाल शेख युसूफ** यांनी मुद्रक, जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै, जि.बीड महाराष्ट्र -४३११२२ येथे छापून साप्ताहिक विश्वनायक कार्यालय, घर क्रं.१/१०/६६ खासबाग, खाजानगर, तुळजाभवानी मंदिर जवळ, ता,जि, बीड, महाराष्ट्र -४३११२२ येथे प्रकाशित केले, **(साप्ताहिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. *वाद विवाद जिल्हा न्यायालया अंतर्गत)** मो. 8686888898
ई-मेल- vishvanayak94@gmail.com

The weekly newspaper, Vishvanayak, is published by its publisher, owner, and editor, Sheikh Bilal Sheikh Yusuf. It is printed at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vaijnath, Taluka Parli Vaijnath, District Beed, Maharashtra - 431122, and published from the Vishvanayak Weekly office, House no,1/10/66,Khasbag, Khajanagar, near Tuljabhavani Temple, Taluka & District Beed, Maharashtra - 431122. (The editor may not necessarily agree with the content and news in the weekly publication.*Disputes are subject to the jurisdiction of the district court) Mobile: 8686888898 - Email: vishvanayak94@gmail.com